# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ३१/०७/२०२२ (रविवार)

---

.

## बॅटरी चोरी

**१.पोलीस स्टेशन कुही :–** अंतर्गत मौजा उंद्री साईलाल कन्स्ट्रक्शन प्लॉट २० किमी पश्चिम. येथे दिनांक २४.०७.२०२२ चे रात्री २३.०० वा ते दिनांक २५.०७.२०२२ रोजी चे सकाळी ०६.०० वा दरम्यान, यातील अज्ञात चोरांनी उंद्री साईलाल कन्स्ट्रक्शन प्लॉट मध्ये लावलेल्या तीन टिपर ट्रक मधुन एक्साईड कंपनीच्या ८८ एमपीआरच्या ०६ बॅट–या प्रती किंमती ३,०००/– रू प्रमाणे एकुण १८,०००/– रू व ०२ हायड्रोरिक जॅक प्रती २,५००/–रू प्रमाणे ५,०००/– रू असा एकुण २३,०००/–रू चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीनी चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविंद्र रामाजी बावनकुळे वय ५९ वर्षे. रा.रामलक्ष्मी सोसायटी कंटोमेन्ट कामठी जि.नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो हवा चांगदेव कुथे पोस्टे कुही मो न ९७६४००७७२० हे करीत आहे.

## उभ्या ट्रकमधुन मोबाईल व नगदी चोरी

**१.पोलीस स्टेशन मौदा_:–** अंतर्गत एस.एस.फूट कंपनी महालगाव २० किमी पश्चिम. दिनांक ३०/०७/२०२२ चे ०१.३० वा ते ०६.३० वा फिर्यादी हे बैतूल मध्यपदेश मधून ट्रक क्र. एम.पी.–४८–जी–२२५१ मध्ये गहू घेवून एस.एस. फुट कंपनी महालगाव कडे रवाना झाले, रात्री ०१.३० वा दरम्यान पोहोंचल्यावर तेथील गार्ड ने फिर्यादी व ट्रक कंपनीच्या आत घेतले नाही. फिर्यादी सोबतच ट्रक. एम.एच.–४०–डी–८७६६, ट्रक क्र एम. एच–४०–सीडी–६६६६ हे सुध्दा ट्रक ला कंपनीच्या आत घेतले नाही. तेव्हा फिर्यादी यांनी ट्रक हे कंपनीच्या बाहेर लावून ट्रकमध्येच झोपले. व दिनांक ३०/७/२२ रोजी सकाळी ०६.३० वा. झोपून उठल्यावर बघितले असता १) ट्रक क्र एम पी.–४८–जी–२२५१ मध्ये ठेवलेला विवो कंपनीचा मोबाईल **कि. १०,०००**/रु एम. आय कंपनीचा मोबाईल कि **४,०००**/–रु जवळ असलेले नगदी **११,०००/रु** २) ट्रक क्र एम.एच. –४०–डी–८७६६ मधून विवो कंपनीचा मोबाईल किमती. अंदाजे **८,०००/रु** एम.आय कंपनीचा मोबाईल कि. **४,५००/–रु** आणि नगदी **१५,०००/रु** ३) ट्रक क्र एम.एच–४०–सीडी–६६६६ एम.आय कंपनी मोबाईल **कि.५,०००/–रु** असा एकूण **३१,०००/–रु** आणि नगदी **३१,५००/– रु असा एकूण ६२,५००**/–रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेद्र नवलकिशोर रहडवे वय २९ वर्ष रा. संतोषी माता मंदीर वार्ड क्र ३ तह .आमला जि. बैतूल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोना देवेन्द्र भूरे मोक्र ९५८८६७९८१४ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन नरखेड :–** अंतर्गत बेलोना शेत शिवार नरखेड. यातील फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतीच्या कारणावरून वाद असुन दिनांक ३०.७.२२ चे ०९.०० वा दरम्यान, फिर्यादी हा आपले शेतात फवारणी करण्याकरीता आला असता, त्या शेतात दोन्ही आरोपी हे हजर होते, आरोपी हा फिर्यादीला म्हणाला की, ही शेती माझी आहे. या कारणावरून आरोपी क्र १) पंकज आजाबराव धरमठोक व २) श्रीमती मंदाबाई आजाबराव धरमठोक दोन्ही रा बेलोना ता नरखेड यांनी संगनमत करून आरोपी क्र १ यांने त्याचे हातात असलेला विळा फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गणपत दयाराम बनाईत वय ५६ वर्ष रा बेलोना ता नरखेड यांचे रिपोर्टवरून पोस्टे नरखेड येथे दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो.ना निलेश खरडे पो स्टे नरखेड मो ९३२५२०३६४७ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन भिवापुर :–** अंतर्गत भगवानपूर २५ किमी दक्षिण. दिनांक ३०/०७/२०२२ चे ०८/१० वा दर. यातील आरोपी टाटा झेस्ट क्र एम एच ३१ इ यु ३६१२ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून समोरून जाणा–या मोटर सायकल गाडी क्र एम एच ३१ बि डब्लू ७६२९ ला समोरून धडक मारून अपघात करून यातील **मृतक राजरत्न अरूण मून यांचे मरणास कारणीभूत झाले व त्याच्या मागे बसलेला त्याचा मित्र मुन्ना कमलाकर नागदेवते वय २४ वर्ष रा. भगवानपुर हा गंभीर जखमी झाला**.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पो हवा प्रफूल माहूरे पो स्टे भिवापूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८,३०४ (अ) भादवी सह कलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस उपनिरीक्षक प्रकाश चनगोले पोस्टे भिवापूर मो.न ९८२३३८०८१५ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बोरी :–** अंतर्गत हळदगाव टोल नाका १८ किमी दक्षिण. दिनांक २९.०७.२२ चे २२.३० वा दर. यातील फिर्यादी यांचे नागपुर ते वर्धा हायवे रोडवर मौजा आसोला सांवगी शिवारात धाबा असुन फिर्यादी हा त्याचा धाबावर हजर असताना नागपुर कडुन वर्धा कडे जाणारा अपाची टी व्ही एस मोटर सायकल क्र एम एच ३२ एक्यु ७७७० वर दोन ईसम डबल सिट जात असताना त्यांचा मागुंन येणारा ट्रक क्र एमएच ४० पीजी ४०७७ चा चालकाने त्याचा ताब्यातील ट्रक भरभाव वेगाने च निष्काळजीपणे चालवुन समोर चालणा–या अपाची मोटर सायकलला मागुन धडक दिल्याने मोटर सायकल वरील २ इसम रोडवर खाली पडल्याने एक इसम नांमे मंथन अंनतराव चांदोरे वय २३ वर्ष रा. वार्ड क्र ६ स्वागत कॉलनी जि वर्धा याला गंभीर मार लागुन जागीच मरण पावला व दुसरा इसम– जखमी नामे मयुर दिवाकर तिजारे वय २६ वर्ष रा जि वर्धा यास उपचारा करीता माया हास्पीटल बुटीबोरी येथे पाठविण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे सुरज अनिल जयसवाल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरूध्द कलम कलम २७९,३३७, ३३८,३०४ अ भादवी सहकलम १८४,१३४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस उपनिरीक्षक पालीवाल पो स्टे बुटीबोरी मो क्र ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**१.पोलीस स्टेशन रामटेक :—** अंतर्गत मनसर ८ किमी पश्चिम. येथील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हीला आरोपी नामे —शुभम गजानन साहारे रा. धानोली जि. भंडारा याने दिनांक २९/७/२०२२ चे १०/०० वा. ते १६/५५ वा. दरम्यान, आमीश दाखवून फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतून फूस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— सहायक पोलीस निरीक्षक/ निशा भुते पोस्टे रामटेक मो.न. ९८२२५ ६६१८० हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**